**प्रेसनोट दि. ०१.०२.२०२२**

श्री.अरूण बवन आठवले वय ३७ वर्ष खाजगी इसम व श्री.प्रज्ञावंत गणपती चवडीकर वय २८ वर्ष खाजगी इसम दोन्ही रा. उत्तर शिवाजीनगर, नविन वसाहत, सांगली यांचे विरूध्द लाच स्विकारलेबावत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांनी जात पडताळणी प्रमाणपत्र मिळणेकरीता समाज कल्याण कार्यालय सांगली येथे अर्ज दिला होता. तक्रारदार यांचे जात पडताळणी प्रमाणपत्राचे काम समाजकल्याण कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना सांगून करून देतो असे म्हणून अरूण आठवले खाजगी इसम यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रूपये लाच मागणी केली असल्यावावतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.३१.०१.२०२२ रोजी दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दि.०१.०२.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे अरूण आठवले खाजगी इसम व संबंधीत अधिकारी यांची पडताळणी केली असता त्यामध्ये अरूण आठवले, खाजगी इसम यांनी तक्रारदार यांना जात पडताळणी प्रमाणपत्राचे काम करून देण्यासाठी समाजकल्याण कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना देण्यासाठी १५,०००/- रूपये व स्वत:साठी ५०००/- अशी एकूण २०,०००/- रूपये लाचेची मागणी करून १५,०००/- रूपये लाच रक्कम प्रज्ञा चवडीकर यांचेकडे देण्यास सांगीतली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर प्रज्ञा चवडीकर यांचेविरूध्द कॉलेज कॉर्नर सांगली या ठिकाणी सापळा लावला असता श्री.प्रज्ञावंत गणपती चवडीकर यांनी श्री.अरूण बवन आठवले यांचे सांगणेवरून तक्रारदार यांचकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून १५,०००/- रूपये स्विकारलेनंतर त्यांना पकडण्यात आले आहे.

श्री.अरूण बवन आठवले वय ३७ वर्ष खाजगी इसम व श्री.प्रज्ञावंत गणपती चवडीकर वय २८ वर्ष खाजगी इसम दोन्ही रा. उत्तर शिवाजीनगर, नविन वसाहत, सांगली यांचे विरुध्द सांगली शहर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, श्री सुहास नाडगौडा, श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार भास्कर भोरे, अविनाश सागर, सलिम मकानदार, संजय संकपाळ, रविंद्र धुमाळ, सिमा माने, राधिका माने, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with CamScanner